ePaper

**पुण्यात चक्क पेट्रोलिंग करणाऱ्या पोलिसांवर हल्ला, लाथा बुक्क्यांनी मारहाण**

वर्ष - 8 I अंक - 354 | UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज ™


**आतील पानांत**

- इंग्लंडच्या एटकिन्सनचा दुर्मिळ विक्रम!
- जो रूटने तेंडुलकरला टाकलं मागे
- भारताने अमेरिकेला ठणकावले!
- निवडणूक आयोगाकडून 'मतांची चोरी


www.mahaenews.com I शनिवार, दि. 2 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## हिंदू-मुस्लिम गट समोरासमोर एकाने हिंदू बाबत विकृत स्टेटस ठेवल्यामुळे राडा

# यवतमध्ये दंगलीचा भडका!

### गोपीचंद पडळकर यांच्या भाषणानंतर तणाव : उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट : परिस्थिती नियंत्रणाखाली !

I यवत / दौंड / पुणे I
प्रतिनिधी I महाईन्यूज

**पुणे जिल्ह्यातील दौंड जवळ असलेल्या यवत गावात जातीय दंगलीचा भडका उडाला. हिंदू - मुस्लिम संघटनांचे कार्यकर्ते समोरासमोर आल्यानंतर प्रचंड तणाव निर्माण झाला. अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी अश्रूधुराची नळकांडी फोडली. धार्मिक स्थळांवर हल्ले, दुकाने फोडणे आणि जाळपोळ असे प्रकार घडले. एका युवकाने आपल्या स्टेटसवर पुजाऱ्या संदर्भातील अश्लील चित्र ठेवल्यामुळे हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येते.**




### परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणाखाली..

यवतमध्ये गेले तीन चार दिवस हिंदू मुस्लिमांमध्ये तणाव असून एका युवकाने मंदिरातील पुजारी छोट्या मुलीचा विनयभंग करीत असल्याचे स्टेटस ठेवल्यामुळे तणावात भर पडली. त्यातच भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी भडकाऊ भाषण केल्यामुळे तणाव वाढल्याचा आरोप काही जणांनी केला आहे.

### अजित पवार यांची भेट, शांततेचे आवाहन..

या सर्व प्रकारानंतर आणि यवत मध्ये तणाव असल्याचे समजतात उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी यवतला भेट दिली आणि दोन्ही गटातील नेत्यांशी चर्चा केली तसेच शांतता राखण्याचे आवाहन केले. त्यानंतर मात्र सर्वत्र तणावपूर्ण शांतता आहे.

### आक्षेपार्ह पोस्टनंतर जाळपोळ

या दंगलीच्या भडक्याला कारण म्हणजे एकाने केलेली आक्षेपार्ह पोस्ट ! त्यानंतर मात्र तणाव वाढला आणि दोन्ही समाज समोरासमोर आल्यामुळे त्यात भरच पडली. परिस्थिती आटोक्यात येण्यासाठी पोलिसांनीअश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या तसेच सौम्य लाठीमारही केला. या घटनेच्या नागरिकांमध्ये संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत.

### आक्षेपार्ह पोस्ट टाकणारा ताब्यात

याबाबत अधिक माहिती अशी, की यवतमध्ये एका तरूणाने सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकली होती. त्यानंतर गावामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या तरुणाला यवत पोलिसांनी तातडीने ताब्यात घेतले आहे. मात्र, काही वेळातच संतप्त झालेल्या जमावाने वाहनांची तोडफाड आणि जाळपोळ केली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रूधूराच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. या पार्श्वभूमीवर यवतचा आठवडे बाजार दुपारी बारानंतर बंद करण्यात आला. तसे पाहिले तर गेल्या आठवडा भरापासून यवतमधील वातावरण तणावग्रस्त आहे. त्यातच आक्षेपर्ह पोस्टची भर पडली.

### पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे अनर्थ टळला..

पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्यामुळे संभाव्य अनर्थ टळला असला तरी गावात तणावाचे वातावरण आहे. सध्या गावात मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, पुढील अनुचित घटना टाळण्यासाठी प्रशासन सतर्क आहे. या घटनेची दखल घेत स्थानिक पोलिसांनी सोशल मीडियावर सतत नजर ठेवण्यास सुरुवात केली आहे. यवत पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून, दोन्ही समाजातील प्रतिनिधींशी संवाद साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. गावातील नागरिकांना शांतता व संयम राखण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### अजित पवारांकडून महत्वाची माहिती..

दरम्यान यवतमधील परिस्थिती पोलिसांनी पूर्णपणे आटोक्यात आणली असून सर्व पोलीस यंत्रणा कार्यरत आहे, तसेच १४४ कलमही लागू करण्यात आले आहे. भेट दिल्यानंतर पत्रकारांशी बोलताना अजित पवार म्हणाले, की प्रत्यक्षात, मध्यप्रदेशमध्ये काही घडलेले होते. एका तरुणाने त्याबाबत सोशल मीडियावर स्टेट्स ठेवले होते. त्याचा यवतशी काही संबंध नव्हता. तरीही त्यानंतर तणावाचे वातावरण निर्माण झाले. एकूण परिस्थिती पाहता एनडीआरएफ जवानही तैनात आहेत. यापूर्वी यवतमध्ये अशी घटना कधीही घडली नाही, असेही अजित पवार म्हणाले.

### माध्यमांना केले आवाहन

तुम्ही माध्यमे काळजीपूर्वक काम करा. भीतीचे वातावरण निर्माण करू नका. तुमचे काम आहे, वस्तुस्थिती दाखवा. पण, घाबरवू नका. आता परिस्थिती पूर्णपणे आटोक्यात आहे. आम्ही सर्व जण यावर लक्ष ठेवून आहोत. पोलिसही यवतमध्ये मोठ्या प्रमाणात तैनात

## गोपीचंद पडळकर यांचे भडकाऊ भाषण

यवतमध्ये आक्षेपार्ह पोस्ट वरून तणाव असतानाच भाजपाचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी त्या ठिकाणी जाऊन जाहीर सभा घेतली. संबंधित पोस्टचा त्यांनी पूर्णपणे निषेध केला. आपल्या घरातील वडिलांचा किंवा आजोबांचा फोटो जर कोणी फोडला किंवा तोडफोड केली तर आपण गप्प बसत नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस किंवा प्रशासनाने येऊन दखल घ्यावी असे आपण म्हणत नाही तर आपला बदला आपणच घेतो, हे लक्षात ठेवा. त्यानंतर मात्र जमाव उधळला आणि यवत मध्ये मशिदीत घुसून तोडफोड केली. तसेच गावातील दुकाने फोडून जाळपोळही मोठ्या प्रमाणावर झाली.

## आयुक्तांचे आदेश — शहरात १०० टक्के पाण्याचे मीटर बसविण्याचा निर्णय

# मीटर बसविण्यास विरोध केल्यास गुन्हा!

।पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**धरणातून उचलले जाणारे पाणी आणि प्रत्यक्षात नागरिकांना मिळणारे पाणी यामध्ये असलेल्या तफावतीचा अभ्यास करून पाणी गळती थांबविण्यासाठी महापालिकेने शहरात १०० टक्के पाण्याचे मीटर बसविण्याचा निर्णय घेतला आहे. जे नागरिक मीटर बसविण्यासाठी विरोध करतील, त्यांचा नळजोड बंद करून त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचा इशारा महापालिकेने दिला आहे. सरकारी कामात अडथळा केल्याबद्दल गुन्हा दाखल केला जाणार आहे..**

### कामात अडथळा आणल्याचा गुन्हा




काही दिवसांपूर्वी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी महापालिकेत पाणीवापराबाबत बैठक घेतली होती. या बैठकीत पुणे महापालिकेला १४ टीएमसी पाण्याचा कोटा मंजूर असताना महापालिका २२ टीएमसी पाणी वापर करीत असल्याचा दावा विखे-पाटील यांनी केला होता. पुढील दोन महिन्यांत पाण्याची गळती नक्की कोठे आणि किती होते, याचा शोध घेण्यासाठी टास्क फोर्सची स्थापना करण्याची घोषणा त्यांनी केली होती.

या बैठकीनंतर पाण्याची गळती रोखण्यासाठी पावले उचलण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे.शहरात पाणी मीटर बसविण्याचे काम प्राधान्याने पूर्ण करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. याबाबत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन यांनी आदेश दिले आहेत. महापालिका प्रशासनाने पुढील महिनाभरात पाण्याचे मीटर बसविण्याचे काम शंभर टक्के पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. पाण्याचे मीटर बसविल्यानंतर प्रत्यक्षात महापालिका धरणातून उचलत असणारे पाणी आणि पाण्याचा होणारा वापर याची सविस्तर आकडेवारी स्पष्ट होईल. काही भागात पाण्याचे मीटर बसविण्यासाठी नागरिकांकडून विरोध होत आहे. विरोध केल्यास संबंधितांचा नळजोड बंद करावा किंवा त्याच्यावर सरकारी कामात अडथळा आणल्याचा गुन्हा दाखल करावा, असे आदेश अतिरिक्त आयुक्त चंद्रन यांनी दिले आहेत. पाण्याचे मोजमाप होण्यासाठी मीटर बसविणे आवश्यक असून यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन देखील महापालिकेने केले आहे.पाण्याच्या टाक्या – ७९ पैकी ६७ टाक्यांची कामे पूर्ण, २४ टाक्या कार्यान्वित, १२ टाक्यांची कामे सुरूमुख्य दाबनलिका – १०१.५४ किमी, ९५.९४ किमीचे काम पूर्ण, ५.६० किमीचे काम सुरूवितरण नलिका- १२६८.९७ किमी, १०९०.७८ किमीचे काम पूर्ण, १६१.६५ किमीचे काम सुरूपाण्याचे मीटर – २ लाख ३२ हजार ६५३, १ लाख ८३ हजार ५१६ मीटर बसविण्यात यश, ४९ हजार १३६ मीटर बसविणे बाकीपाणीपुरवठा झोन – १४१, ४१ (११ झोन गळती शोधणे व दुरुस्ती कामे पूर्ण) १०० झोनची कामे अद्याप नाहीत. काही दिवसांपूर्वी जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी महापालिकेत पाणीवापराबाबत बैठक घेतली होती. या बैठकीत पुणे महापालिकेला १४ टीएमसी पाण्याचा कोटा मंजूर असताना महापालिका २२ टीएमसी पाणी वापर करीत असल्याचा दावा विखे-पाटील यांनी केला होता. पुढील दोन महिन्यांत पाण्याची गळती नक्की कोठे आणि किती होते, याचा शोध घेण्यासाठी टास्क फोर्सची स्थापना करण्याची घोषणा त्यांनी केली होती. पूर्ण करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. याबाबत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त एम. जे. प्रदीप चंद्रन यांनी आदेश दिले आहेत. महापालिका प्रशासनाने पुढील महिनाभरात पाण्याचे मीटर बसविण्याचे काम शंभर टक्के पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. पाण्याचे मीटर बसविल्यानंतर प्रत्यक्षात महापालिका धरणातून उचलत असणारे पाणी आणि पाण्याचा होणारा वापर याची सविस्तर आकडेवारी स्पष्ट होईल. काही भागात पाण्याचे मीटर बसविण्यासाठी नागरिकांकडून विरोध होत आहे. विरोध केल्यास संबंधितांचा नळजोड बंद करावा

### १०० झोनची कामे अद्याप नाहीत

अतिरिक्त आयुक्त चंद्रन यांनी दिले आहेत. पाण्याचे मोजमाप होण्यासाठी मीटर बसविणे आवश्यक असून यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, २ लाख ३२ हजार ६५३, १ लाख ८३ हजार ५१६ मीटर बसविण्यात यश, ४९ हजार १३६ मीटर बसविणे बाकीपाणीपुरवठा झोन – १४१, ४१ (११ झोन गळती शोधणे व दुरुस्ती कामे पूर्ण) १०० झोनची कामे अद्याप नाहीत.

# तणाव निर्माण करणाऱ्यांवर कारवाई

## मुख्यमंत्री फडणवीस यांचा इशारा; कोणालाही सोडले जाणार नाही

।पुणे ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**यवत येथील एका व्यक्तीने समाजमाध्यमात चुकीचे स्टेटस ठेवल्यामुळे तणाव निर्माण झाला. मात्र, तेथील परिस्थिती नियंत्रणात आहे. जाणीवपूर्वक तणाव निर्माण झाला पाहिजे, यासाठी काही लोक असे 'स्टेटस' ठेवून अशा घटना घडवित आहेत. कोणालाही सोडले जाणार नाही. संबंधितांवर कठोर कारवाई केली जाईल,' असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.**




लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने दिल्या जाणाऱ्या लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान कार्यक्रमानंतर फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'तणाव निर्माण झाल्याने पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला. मात्र, आता तेथील परिस्थिती नियंत्रणात आहे. अशी घटना घडविणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. सभा झाल्यानंतर असे 'स्टेटस' ठेवण्याची मुभा कोणालाही नाही.

धर्मावर टीका करण्याचे अधिकारही कोणाला नाहीत. सभेचा आणि या घटनेचा कोणताही संबंध नाही.

सभा झाली म्हणून असे कृत्य केले असे कोणी म्हणत असेल, तर ते सहन केले जाणार नाही.'समाजमाध्यमातून पुढे आलेल्या चित्रफिती नेमक्या तेथील आहेत, की बाहेरच्या आहेत, हे पाहावे लागेल. त्यामुळे या सर्व गोष्टींची सखोल चौकशी केली जाईल,' असे फडणवीस यांनी सांगितले.लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीने दिल्या जाणाऱ्या लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान कार्यक्रमानंतर फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'तणाव निर्माण झाल्याने पोलिसांना सौम्य लाठीमार करावा लागला.

### तर ते सहन केले जाणार नाही

मात्र, आता तेथील परिस्थिती नियंत्रणात आहे. अशी घटना घडविणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. सभा झाल्यानंतर असे 'स्टेटस' ठेवण्याची मुभा कोणालाही नाही. धर्मावर टीका करण्याचे अधिकारही कोणाला नाहीत. सभेचा आणि या घटनेचा कोणताही संबंध नाही. सभा झाली म्हणून असे कृत्य केले असे कोणी म्हणत असेल, तर ते सहन केले जाणार नाही.

## पिंपरी कॅम्पमध्ये दहशत — तरुण व्यावसायिकावर दिवसाढवळ्या गोळीबार

# 20 वर्षीय व्यावसायिकावर गोळीबार!

### व्यावसायिक गंभीर जखमी, खाजगी रुग्णालयात उपचार सुरु

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शुक्रवारी (दि. १) दुपारी पिंपरी कॅम्प मार्केट परिसरात दुचाकीवरून आलेल्या एका अज्ञात गुन्हेगाराने २० वर्षीय व्यावसायिकावर गोळीबार केला. या घटनेमुळे पिंपरी कॅम्पमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.**





या घटनेत तरुण व्यावसायिक भावेश कन्हैयालाल कंकराणी (वय २०, रा. पीडब्ल्यूडी क्वार्टर्स) यांच्या पायाला गोळी लागली. घटनेनंतर लगेचच पिंपरी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून तपास सुरू केला. पोलिसांच्या मते, व्यावसायिकाच्या गळ्यातील साखळी चोरण्यासाठी हा गोळीबार करण्यात आला होता. परंतु तपासानंतरच मुख्य कारण स्पष्ट होण्याची शक्यता आहे. गोळीबाराच्या या घटनेने पिंपरी चिंचवड शहर हादरले आहे. ही घटनाशुक्रवारी दुपारी १:१५ च्या सुमारास घडली.

या संदर्भात पोलिस उपायुक्त शिवाजी पवार यांनी सांगितले की, सीसीटीव्ही फुटेजमध्ये आरोपी भावेश कंकराणी यांच्या दुकानासमोर उभा असल्याचे दिसून येत आहे. भावेश कंकराणी यांच्या गळ्यातील सोन्याची साखळी हिसकावून घेतल्यानंतर, आरोपी तरुण दुचाकीवरून पळून जात असल्याचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. भावेश कंकराणींवर गोळीबार करणाऱ्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पिंपरी पोलिसांनी १० पोलिस पथके तयार केली आहेत. आरोपींना पकडण्यासाठी पोलिस युद्धपातळीवर प्रयत्न करत आहेत. अशी माहिती पोलिस उपायुक्त शिवाजी पवार यांनी दिली.

व्यावसायिकावर गोळीबार केल्यानंतर, आरोपींनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची साखळीही लुटली आणि पळून गेले. भावेश कंकराणी यांच्या दुकानासमोर अज्ञात गुन्हेगाराने गोळीबार केला. गोळीबारात भावेश कंकराणी गंभीर जखमी झाला आणि त्याच्यावर पिंपरीतील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

#### व्यापारी वर्गात दहशत

घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड पोलिस दलाचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी पोहोचले. मात्र, दिवसाढवळ्या बाजारात व्यावसायिकावर झालेल्या गोळीबारामुळे परिसरातील नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. स्थानिक नागरिक आणि व्यावसायिकांनी व्यापाऱ्यावर गोळीबार करणाऱ्या आरोपीला तात्काळ अटक करण्याची आणि त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी पोलिसांकडे केली आहे.

#### सीसीटीव्ही फुटेजची चौकशी

घटनेची माहिती मिळताच पिंपरी पोलिस स्टेशन, गुन्हे शाखेचे पथक आणि फॉरेन्सिक युनिटचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे आणि आरोपीचा शोध सुरू आहे. पोलिसांनी भावेशकडून सविस्तर माहिती घेतली आहे आणि त्याचा मोबाईल डेटा आणि कॉल रेकॉर्ड देखील तपासले जात आहेत.

#### व्यवसायिकांमध्ये घबराट...

गोळीबाराची माहिती मिळताच माजी उपमहापौर डब्बू आसवानी, माजी नगरसेवक संदीप वाघरे यांनी घटनास्थळी पोहोचून जखमी तरुणाला तात्काळ खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. आरोपीला तात्काळ अटक करून त्याला कठोर शिक्षा देण्याची मागणी करण्यात आली. शहरातील गुन्हेगारीचा आलेख वाढला आहे. नागरिक आणि व्यावसायिक घाबरले आहेत.

> “ प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, दुचाकीवरून आलेला आरोपी चोर भावेशच्या गळ्यातील साखळी ओढून पळून जाण्याचा प्रयत्न करत होता. भावेशने प्रतिकार केला तेव्हा आरोपींनी गोळीबार केला. यात भावेश जखमी झाला. मात्र पोलिस इतर दृष्टिकोनातूनही तपास करत आहेत.
> **-शिवाजी पवार,** पोलिस उपायुक्त, पिंपरी चिंचवड

---

# पुण्यात उच्च न्यायालयाच्या खंडपीठासाठी आ. लांडगे मैदानात!

### पुणे, पिंपरी-चिंचवडमधील वकील संघटनांच्या मागणीला सक्रीय पाठींबा

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबई उच्च न्यायालयाचे पुण्यामध्ये फिरते खंडपीठ स्थापन करण्याच्या मागणीबाबत सरन्यायाधीश आणि राज्यपाल यांनी प्राधान्याने निर्णय घ्यावा. यासह महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेने याबाबत पाठपुरावा करावा, अशी मागणी पुणे बार असोसिएशन सह जिल्ह्यातील सर्व वकील संघटनांनी केली. या मागणीला पाठिंबा भाजपा आमदार महेश लांडगे पाठिंबा दर्शवला आहे. तसेच, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे.**




पुणे शहरात उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे, अशी मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. त्यासाठी आता ‘पुणे बार असोसिएशन’ने पुढाकार घेतला आहे. अधिवक्ता एस्. के. जैन यांच्या अध्यक्षतेखाली ‘खंडपीठ कृती समिती’ची स्थापना केली आहे. या समितीत पुण्यातील ५ बार कौन्सिलचे सदस्य आणि पुणे जिल्ह्यातील सर्व तालुका बार असोसिएशनच्या अध्यक्षांचा समावेश केला आहे. वास्तविक, पुण्यात उच्च न्यायालयाचे फिरते खंडपीठ पुणे शहरात व्हावे. यासाठी आमदार लांडगे 2016 पासून पाठपुरावा करीत आहेत. या पार्श्वभूमीवर पुण्यात उच्च न्यायालय खंडपीठाच्या मागणीला आमदार महेश लांडगे यांनी पाठिंबा जाहीर केला. यावेळी पुणे जिल्हा वकील संघटनेच्या विद्यमान उपाध्यक्षा, ॲड. सुरेखा भोसले, ॲड. विश्वास खराबे, ॲड. मंगेश खराबे, ॲड. हर्षवर्धन पाटील, ॲड. सुशांत शिंदे उपस्थित होते. आमदार लांडगे म्हणाले की, “ही मागणी केवळ वकिलांची नसून, संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातील जनतेच्या न्यायहक्कासाठीची मागणी आहे.

मुंबईत वारंवार प्रवास करून न्याय मिळवणे म्हणजे केवळ आर्थिक व शारीरिक त्रास नव्हे, तर एक मानसिक संकट बनले आहे. पुणे ही न्यायव्यवस्थेसाठी सर्व प्रकारची पायाभूत सुविधा असलेले शहर असून, येथे खंडपीठ स्थापन होणे स्वाभाविक व न्याय्य निर्णय ठरेल. न्याय सुलभतेसाठी ठिकाण” म्हणून पुणे हे ठिकाण निश्चित व्हावे, अशी आमची भूमिका आहे.

> “ पुणे जिल्हा व पश्चिम महाराष्ट्रातील नागरिकांची न्याय सुलभतेसाठीची हक्काची लढाई आहे. विविध खटल्यांसाठी पक्षकार आणि विधीतज्ञ यांना मुंबईला प्रवास करणे ही फक्त शारीरिक व आर्थिक झळ नाही, तर एक मानसिक यातनाही आहे. परिणामी, हजारो खटले प्रलंबित आहेत. याला पर्याय म्हणून पुण्यात खंडपीठ स्थापन झाले, तर न्याय मिळविणे सोपे होईल, वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होईल. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या स्तरांवर ‘सर्किट बेंच’ संदर्भात पाठपुरावा सुरू आहे. लवकर यावर निर्णय होईल, अशी अपेक्षा आहे.
> **--महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



### आनंद कशामुळे मिळतो ?

सृष्टी शून्यापासून निर्माण झाली. आपलीही मूळ स्थिती तीच आहे, म्हणून आपण शून्याकडे जाण्याचा प्रयत्न करावा; म्हणजेच, स्वानंदात स्वस्थ राहावे. पण ते आपल्या हातून होत नाही, कर्म करीतच राहावे असे वाटते. प्रपंचाची दगदग झाली म्हणजे आपण दूर जाऊन बसतो; पण मनाची तळमळ त्यामुळे नाहीशी झाली नाही, तर काय उपयोग ? याकरिता मनाची स्वस्थता कशाने येईल ते पाहावे. आनंद कुणाला नको आहे ? आपल्याला आनंद हवा आहे खरा, परंतु तो मिळविण्यासाठी जे करायला पाहिजे ते आपण करीत नाही. नोकरी नको आणि खायला हवे, हे कसे शक्य आहे ? खरोखर, प्रपंचाच्या या अगणित उपाधींतून सुटून जो स्वास्थ्याकडे जातो तो धन्यच होय. मनाच्या विरुद्ध गोष्टी झाल्या की लगेच आपल्या आनंदात बिघाड येतो; याकरिता, आपल्या इच्छेविरुद्ध घडले तरी माझे स्वास्थ्य बिघडणार नाही, इकडे पाहावे. याला एकच उपाय आहे, आणि तो म्हणजे माझी इच्छाच मी नाहीशी करणे. कोणतीही वस्तू मिळावी किंवा अमुक एक गोष्ट घडावी, ही बुद्धीच ठेवू नये. जोपर्यंत हाव आहे तोपर्यंत स्वास्थ्यापासून आपण दूर आहोत असे समजावे. महत्त्वाकांक्षा खुशाल धरावी, पण त्यामुळे मनाला त्रास होऊ देऊ नये. भगवंताची इच्छा तीच माझी इच्छा असे म्हणावे, आणि अभिमान सोडून कर्म करीत राहावे. प्रयत्न करून जे काही होते, ते रामाच्या इच्छेने झाले म्हणावे. कर्तेपणाचा अभिमान सोडल्यानेच स्वास्थ्य लाभते. मागे घडलेल्या चांगल्या-वाईट गोष्टी आठवत राहणे यामुळे आनंदात बिघाड येतो. तसेच उद्यांची काळजी करीत राहाणे यामुळेही मनाच्या स्वास्थ्यात व्यत्यय येतो. होते-जाते हे सर्व भगवंताच्या इच्छेने होते, हे मनाने पक्के ठरविल्यावर मग विनाकारण काळजी का करावी ? दु:ख करणे अथवा न करणे हा मनाचा धर्म असल्यामुळे, ज्या माणसाने मनाला योग्य वळण दिले आहे, तो प्रत्यक्ष दुखणे भोगीत असताही आनंदात राहू शकेल. म्हातारपणी तर आनंद हे मोठे शक्तिवर्धक औषध आहे. ज्याला नामाचे प्रेम आले त्याला शरीराच्या कोणत्याही अवस्थेत आनंदाचा लाभ होतो; आणि ज्याला असा आनंदाचा लाभ झाला, त्याच्यावर रामाने कृपा केली असे खचित समजावे. भगवंतासाठी एकच दान खरे आहे, आणि ते म्हणजे आत्मदान होय. सतत भगवंताच्या नामात राहून देहाची विस्मृती होणे हा आत्मदानाचाच प्रकार आहे.

बोधवचन:- वाणीने नाम घ्यावे व मनाने स्मरण करावे, आणि या दोन्हीचा मेळ असावा.

# आरोपींचा छळ करण्याची घाई, निकाल देताना, प्रचंड दिरंगाई!



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

संस्थापक, संपादक

**मुंबईतील लोकलमध्ये झालेल्या बॉम्बस्फोटांचा निकाल गेल्या पंधरवड्यात लागला आणि सर्व आरोपी निर्दोष सुटले ! त्यानंतर परवा लागलेल्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणाच्या निकालातही सर्व सात आरोपींची विशेष 'एनआयए' न्यायालयाने ठोस पुराव्यांअभावी निर्दोष मुक्तता केली. सुमारे १७ वर्षे चाललेल्या या प्रदीर्घ खटल्यानंतर न्यायालयाने हा आदेश दिला, सर्वांनी सुस्कारा टाकला आणि 'भगवा दहशतवाद' मोडीत निघाला.**




### आरोपी घरी कोण कोण?

मालेगावमध्ये झालेल्या बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी कोण होते, याकडे एक नजर टाकू या. या आरोपींमध्ये माजी भाजपा खासदार प्रज्ञा सिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त एक मेजर आणि कट्टर हिंदुत्ववादी नेत्यांचाही समावेश आहे. सरकारी वकिलांनी कोणताही ठोस पुरावा सादर न केल्यामुळे सर्व आरोपींना निर्दोष मुक्त करत असल्याचे विशेष न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी आपल्या निकालात नमूद केले आहे. २००८ मध्ये नाशिक जिल्ह्यात मालेगाव इथं हा बॉम्बस्फोट झाला होता.

### तपास करणाऱ्या यंत्रणा..

या प्रकरणाचा सुरुवातीचा तपास एटीएस अर्थात् दहशतवाद विरोधी पथकाने केला होता.
याप्रकरणी १२ जणांना अटक झाली होती. त्यानंतर हा तपास एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे सोपवण्यात आला होता. या प्रकरणातला अंतिम युक्तिवाद एप्रिल २०२४ मध्ये संपला आणि न्यायालयाने दि. १९ एप्रिल रोजी या खटल्याचा निकाल राखून ठेवला होता. खटल्यातल्या १२ आरोपींपैकी तीन जणांची यापूर्वीच निर्दोष सुटका झाली होती. तर दोन आरोपींवर फक्त शस्त्रास्त्र कायद्याअंतर्गत खटला चालवला जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले होते.

### रेल्वे बॉम्बस्फोटाचाही निकाल

एकूण काय, गेल्या आठवड्यात १९ वर्षांनी लागलेल्या रेल्वे बॉम्बस्फोटाच्या निकालानंतर हा महत्वाचा निकाल आहे. मुंबई येथे लोकलमध्ये झालेल्या साखळी बॉम्ब स्फोटाच्या मालिकेतही आरोपी पुराव्या अभावी, तसेच तपास यंत्रणेच्या त्रुटीमुळे सुटले.

### सर्वोच्च न्यायालयात आव्हान..

आता त्यांच्या निर्दोष होण्याच्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले जाणार आहे. त्याच प्रकारे या मालेगाव बॉम्बस्फोट निकालालाही पुढे आव्हान दिले जाईल का, हा विरोधकांचा सवाल आहे. मालेगाव खटल्यातील आरोपी हिंदू तर मुंबई साखळी बॉम्बस्फोटाच्या मालिकेतील आरोपी मुस्लिम आहेत. साहजिकच, आता राज्य सरकारच्या भूमिकेकडे सगळ्यांचेच लक्ष लागलेले असेल, हे वेगळे सांगायला नको !

### आव्हाड यांचे अतार्कीक विधान..

दहशदवादाला जात, रंग नसतो असे अतार्किक विधान जितेंद्र आव्हाड त्यांनी केले आहे. जर दहशदवादाचा हेतू , त्यात असलेली मंडळी , ती कुठून नियंत्रित केली जातात , कशी नियंत्रित केली जातात , कोणा विरोधात केली जातात याचा विचार केला, तर दहशदवादाला रंग नसतो असे कसे म्हणणार ? आणि आव्हाडांचा मित्रपक्ष असणाऱ्या काँग्रेस पक्षाचे तत्कालीन गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी 'भगवा दहशदवाद', 'हिंदू दहशदवाद' हा शब्द जन्माला घातला. त्यांचा निषेध ते करणार की नाही ? याचे उत्तर त्यांनी प्रथम द्यायला हवे !

### कोणताही हल्ला हा निषेधार्हच !

कोणताही हल्ला, तोही निरपराध, सर्वसामान्य व्यक्तींवर होतो तो निंदनीय, निषेधार्हच असतो. मात्र, सहा नमाजी मालेगाव येथे स्फोटात गेल्याचे दुःख बाळगणाऱ्या मंडळींनी आजपर्यंत हजारो हिंदू निरपराध मृत्यूमुखी पडल्याचे दुःख का व्यक्त केले नाही? हा प्रश्नही विचारला जाणारच. तेव्हा खरेच जातीच्या पलीकडे जाऊन संवेदनशीलतेने या घटनांकडे पाहायला हवे. सध्या पोलीस यंत्रणा, इतर तपास यंत्रणा, न्यायव्यवस्था या सगळ्यांवरच प्रश्नचिन्ह आणि संशय व्यक्त करण्याची प्रथा निर्माण झाली आहे. मुंबईतले आरोपी सुटले तर तपास करणारे त्यावेळच्या सरकारच्या म्हणजे काँग्रेसच्या तालावर नाचले. तपास नीट केला नाही, असा आरोप केला गेला. आता मालेगाव येथील आरोपी सुटले, तर न्यायव्यवस्थेला पुरावे देणारी यंत्रणा दबावाखाली होती. वकिलांना नरमाईची भूमिका घेण्याचा संदेश देण्यात आला होता, म्हणे!

### न्याय व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत..

न्यायव्यवस्था, तपासयंत्रणा प्रश्नांकित आहे, असे सगळे आरोप होत आहेत. एकूण न्यायदान जलद गतीने व्हायला  पाहिजे. ज्यांची १९ वर्षे, १७ वर्षे तुरुंगात गेली, समाजातून बहिष्कृत म्हणून प्रतिष्ठा गेली, शारीरिक, मानसिक खच्चीकरण झाले त्यांचे काय ? म्हणूनच निकाल जलद लावले पाहिजेत आणि लोकशाहीच्या स्तंभांनी विश्वासार्ह वागले पाहिजे, तर जनता संशयमुक्त होईल.तसेच विरोधकांनी न्यायालयाचे निकाल, निवडणुकीचे निकाल लागल्यानंतर आपल्या बाजूने लागले नाही, तर समाजात भ्रम, गैरसमज, अविश्वास निर्माण करायचा, हे तंत्र थांबवले पाहिजे. लोकशाही परस्परांवरील विश्वासावर मजबूत होते, अर्थात विवेक, विचार, विश्वास आणि लोकशाही जिवंत ठेवायची इच्छा असेल तर..!

### नुकसान कसे भरून निघणार ?

स्फ़ोटांसारखी एखादी दुर्दैवी घटना घडते..आरोपींना तातडीने पकडले जाते, त्यांची रवानगी अर्थात् च तुरुंगात केली जाते. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपीने गुन्हा कबूल करावा म्हणून त्याचा पंधरा - पंधरा वर्षे अनन्वित छळ केला जातो आणि अंतिम निकाल मध्ये तो निर्दोष म्हणून सोडला जातो. आता, या संपूर्ण प्रकारात त्याच्या आयुष्यातील वाया गेलेली पंधरा-वीस वर्षे, त्याचा शारीरिक आणि मानसिक छळ झाल्यामुळे त्याने भोगलेले नुकसान कसे भरून निघणार ? यावर खरे तर संशोधन व्हावे आणि त्यावर तोडगा निघावा. या दोन्ही निकालावरून तेवढा शहाणपणा आमच्या न्यायव्यवस्थानी घेतला, तरी खूप काही साध्य झाले, असे म्हणायचे!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

कारवाई

## पालिकेने कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली

# ठाणे परिसरातील कचरा मुंबईच्या हद्दीत!

## एका कॅटररवरही दंडात्मक कारवाई

।मुंबई।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ठाणे परिसरातील कचरा मुंबईच्या हद्दीत आणून टाकल्याप्रकरणी मुंबई महापालिकेने दंडात्मक कारवाई केली आहे. एका ठिकाणी घाऊक प्रमाणात कचरा निर्मिती करणाऱ्या (बल्क वेस्ट जनरेटर) आणि इतर ठिकाणी त्याची अनधिकृतपणे विल्हेवाट लावणाऱ्या व्यक्ती, व्यावसायिक किंवा कंत्राटदार, तसेच आस्थापनांविरोधात मुंबई महानगरपालिकेने कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. त्याअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. याचबरोबर खार येथून साकीनाका येथील मिठी नदी परिसरातील कचरापेटीबाहेर मोठ्या प्रमाणात कचरा आणून टाकणाऱ्या एका कॅटररवरही मोठी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.**




एका विभागातील कचरा दुसऱ्या विभागात आणून टाकणाऱ्यांविरोधात मुंबई महापालिकेने कारवाई हाती घेतली आहे. त्याअंतर्गत घोडबंदर मार्ग, ठाणे येथील आयडीएफसी बँक लिमिटेडवर कारवाई करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

घाऊक प्रमाणात कचरा निर्मिती करणाऱ्या (बल्क वेस्ट जनरेटर) आणि तो कचरा रात्री-अपरात्री इतर भागांमध्ये नेऊन टाकणाऱ्या व्यक्ती, व्यावसायिक किंवा कंत्राटदार, तसेच आस्थापनांविरोधात कठोर कारवाई करावी. तसेच, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी, तसेच त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी पथक नेमण्याचे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी दिले होते. या कारवाईच्या पार्श्वभूमीवर, मुंबई महानगरपालिकेच्या कुर्ला परिसरातील 'एल' विभागातील पथकाने खार येथील 'द गौरव कॅटरर्स'विरोधात गुरुवारी कारवाई केली. 'द गौरव कॅटरर्स'कडून मोठ्या प्रमाणात उर्वरित अन्नपदार्थ ३० ते ३१ जुलै २०२५ च्या रात्री साकीनाका येथील मिठी नदी परिसरातील कचरापेटी बाहेर टाकण्यात आला होता. ही बाब 'एल' विभागातील पथकाच्या सदस्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी संपूर्ण कचऱ्याची पाहणी करून त्यातून संबंधित आस्थापनेविषयी माहिती मिळवली. त्यानंतर, ३१ जुलै २०२५ रोजी खार येथील 'द गौरव कॅटरर्स'च्या कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन त्यांच्यावर कारवाई केली. बृहन्मुंबई स्वच्छता आणि आरोग्य उपविधी-२००६ अंतर्गत आपले अंगण स्वच्छ न ठेवणे, धोकादायक कचऱ्याचे निर्देशित पद्धतीने वर्गीकरण न करता विल्हेवाट लावणे या उपद्रवाच्या संदर्भात १० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला.अशाचप्रकारे इतरत्र कचरा टाकणाऱ्या एकूण ७ आस्थापनांवर 'एल' विभागाने १२ जूनपासून आजपर्यंत ६५ हजार रुपये दंड ठोठावला आहे. घोडबंदर मार्ग, ठाणे येथील आयडीएफसी बँक लिमिटेड, मरोळ येथील अशोक टॉवर गृहनिर्माण संस्था, विक्रोळी (पश्चिम) येथील एचडीएफसी बँक, कुर्ला येथील टॅक्सीमॅन, तसेच सिमरन गृहनिर्माण संस्था, ब्राह्मणवाडी येथील गोदावरी गृहनिर्माण संस्था, इम्तियाज लाईन डेपो यांचा समावेश आहे. या आस्थापनांना रितसर नोटीस बजावून दंड ठोठावण्यात आला आहे.एका विभागातील कचरा दुसऱ्या विभागात आणून टाकणाऱ्यांविरोधात मुंबई महापालिकेने कारवाई हाती घेतली आहे. त्याअंतर्गत घोडबंदर मार्ग, ठाणे येथील आयडीएफसी बँक लिमिटेडवर कारवाई करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. घाऊक प्रमाणात कचरा निर्मिती करणाऱ्या (बल्क वेस्ट जनरेटर) आणि तो कचरा रात्री-अपरात्री इतर भागांमध्ये नेऊन टाकणाऱ्या व्यक्ती, व्यावसायिक किंवा कंत्राटदार, तसेच आस्थापनांविरोधात कठोर कारवाई करावी. त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी पथक नेमण्याचे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांनी दिले होते.

### ७ आस्थापनांवर कारवाई

या कारवाईच्या पार्श्वभूमीवर, मुंबई महानगरपालिकेच्या कुर्ला परिसरातील 'एल' विभागातील पथकाने खार येथील 'द गौरव कॅटरर्स'विरोधात गुरुवारी कारवाई केली. 'द गौरव कॅटरर्स'कडून मोठ्या प्रमाणात उर्वरित अन्नपदार्थ ३० ते ३१ जुलै २०२५ च्या रात्री साकीनाका येथील मिठी नदी परिसरातील कचरापेटी बाहेर टाकण्यात आला होता.

---

# बहिणींना १५०० रुपये कधी मिळणार?

## रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला जुलै महिन्याचा सन्मान निधी

।मुंबई।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महायुती सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' ही योजना सुरू केलेली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यातील लाखो पात्र महिलांना दर महिन्याला १ हजार ५०० रुपये लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा केले जातात. दरम्यान, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जुलै महिन्याचा हप्ता जुलै महिना संपला तरी अद्याप लाडक्या बहिणींना मिळालेला नाही.**



त्यामुळे जुलै महिन्याचा हप्ता कधी मिळणार? याकडे लाडक्या बहिणींचं लक्ष लागलं होतं. दरम्यान, आता राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्या तथा राज्याच्या महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडक्या बहिणींना खुशखबर दिली आहे. लाडक्या बहिणींना रक्षाबंधनाची भेट मिळणार आहे, म्हणजेच रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला जुलै महिन्याचा सन्मान निधी (१५०० रुपये) राज्य सरकारकडून लाडक्या बहिणींना वितरित करण्यात येणार असल्याची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी एक्सवर पोस्ट शेअर करत दिली आहे."लाडक्या बहिणींना रक्षाबंधनाची भेट!, माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या सर्व पात्र लाभार्थ्यांना रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला जुलै महिन्याचा सन्मान निधी (१५०० रुपये) वितरित करण्यात येणार आहे. रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला सर्व पात्र लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात सन्मान निधीची रक्कम थेट लाभ हस्तांतरणाद्वारे जमा करण्यात येईल", अशी माहिती आदिती तटकरे यांनी एक्सवरील पोस्टद्वारे दिली आहे.

### आदिती तटकरे यांनी काय म्हटलं?

महायुती सरकारने सुरू केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यात प्रचंड लोकप्रिय झाली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सरकारने योजना आणली आणि महिलांनी योजनेला उचलून धरले. मासिक १५०० रुपये थेट महिलांच्या खात्यात जमा होत असल्यामुळे अनेकांनी या योजनेचा लाभ घेतला. १४,२९८ पुरुषांनीही लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याचे उघडकीस आले आहे.

## रशियाशी मैत्री! भारताचे अमेरिकेबरोबरही संबंध मजबूत

# भारताने अमेरिकेला ठणकावले!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि रशियाचे संबंध दीर्घ काळापासून असून, ते स्थिर आणि काळाच्या कसोटीला उतरले आहेत,' या शब्दांत भारताने अमेरिकेचे नाव न घेता रशियाबरोबरील भारताची भूमिका शुक्रवारी ठणकावून सांगितली. भारताचे कुठल्याही देशाबरोबर संबंध हे त्या देशाच्या एकूण मूल्यमापनावर आधारित असतात. त्याकडे तिसऱ्या देशाला काय वाटते, या चौकटीतून त्याकडे पाहू नये असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी बजावले.**

### जागतिक सामरिक भागीदारी



भारत-अमेरिकेमधील संबंध अनेक स्थित्यंतरांतून गेल्याची वस्तुस्थितीही मांडली. भारत-रशियाच्या अर्थव्यवस्था मृतवत असून, त्या एकत्रित बुडाल्या, तरी मला त्याची फिकीर नाही, या शब्दांत ट्रम्प यांनी टीका केल्यानंतर परराष्ट्र मंत्रालयाने आक्रमक भूमिका घेतली. ऊर्जा क्षेत्रातील खरेदी ही बाजारपेठेवर आधारित आणि राष्ट्रहिताच्या चौकटीत होते. ऊर्जा क्षेत्राला कुठल्या कुठल्या गोष्टींची गरज लागते, हे तुम्हाला चांगले ठाऊक आहे. जागतिक स्थिती पाहून बाजारपेठेत काय उपलब्ध आहे, हे पाहून खरेदी केली जाते.भारताचे अमेरिकेबरोबरही संबंध मजबूत आहेत. भारत-अमेरिका संबंध परस्परहितसंबंधांवर आधारित आहेत. बाह्य आव्हानांमुळे हे संबंध अनेक स्थित्यंतरांतून गेले आहेत. भारत-अमेरिकेत सर्वसमावेशक जागतिक सामरिक भागीदारी आहे. परस्परहितसंबंध, लोकशाही मूल्ये, जनतेचा थेट संबंध या सामायीक बाबी आहेत. हे संबंध आणखी मजबूत होऊन पुढे कसे जातील, याकडे आमचे लक्ष आहे.'युक्रेनबरोबरील युद्धाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने रशियावर निर्बंध घातले आहेत. रराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांनी भारतावर रशियातून भारत मोठ्या प्रमाणावर तेलखरेदी आणि शस्त्रखरेदी करीत असल्याबद्दल सातत्याने टीका केली आहे. ट्रम्प यांनी याच कारणामुळे भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या वस्तूंवर २५ टक्के कर लावला आहे. रशियातून भारत खरेदी करीत असलेले तेल हा वादाचा मुद्दा असल्याचे रुबिओ यांनी म्हटले होते.रशियाकडून कच्चे तेल आणि लष्करी उपकरणे खरेदी केल्याबद्दल भारतावर 'दंड' आकारण्याचा प्रस्ताव अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ठेवला

### रशियातून तेलखरेदीला खंड

या वृत्ताबाबत विचारले असता, भारतातील तेल कंपन्यांनी रशियातून तेलखरेदी थांबविल्याबाबत काही माहिती नसल्याचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी सांगितले.भारत-अमेरिकेमधील संबंध अनेक स्थित्यंतरांतून गेल्याची वस्तुस्थितीही मांडली. भारत-रशियाच्या अर्थव्यवस्था मृतवत असून, त्या एकत्रित बुडाल्या, तरी मला त्याची फिकीर नाही.

होता. भारतावर २५ टक्के आयात शुल्क लागू करण्याचा निर्णय घेताना बुधवारी ट्रम्प यांनी ही घोषणा केली होती. मात्र याबाबत स्पष्टता नसल्याचे दिसून येत आहे. ट्रम्प यांनी कर लागू करण्याच्या कार्यकारी आदेशावर गुरुवारी स्वाक्षरी केली.मात्र भारतावर आकारण्यात येणाऱ्या दंडाचा त्यात उल्लेख नाही. कार्यकारी आदेशानुसार कर लागू करण्याची तारीख ७ ऑगस्टपर्यंत बदलण्यात आली आहे. तथापि, दंडाबाबत अस्पष्टता आहे. कदाचित अमेरिकेने केलेल्या मागण्या मान्य करण्यासाठी दंडाची घोषणा दबावतंत्र असू शकते, असे सूत्रांनी सांगितले. भारत आणि अमेरिका यांच्यात अंतरिम व्यापार करारासाठी वाटाघाटी अजूनही सुरू आहेत. मात्र कृषीजन्य वस्तू, दुग्धजन्य पदार्थ आणि जनुकीय सुधारित (जीएम) उत्पादनांवरील शुल्क सवलतींबाबत कोणतीही तडजोड होणार नाही, असे सूत्रांनी शुक्रवारी सांगितले. करारासाठी दोन्ही देशांमध्ये सतत चर्चा सुरू आहे. मात्र भारताने कृषी वस्तू, दुग्धजन्य पदार्थ आणि जीएम उत्पादनांसाठी स्पष्टपणे भूमिका घेतली आहे. घोषणेनंतर भारतातील सरकारी तेल कंपन्यांनी रशियातून तेलखरेदी थांबविल्याचे वृत्त आहे. मँगलोर रिफायनरीज अँड पेट्रोकेमिकल्स लिमिटेड, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन, हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन या कंपन्यांनी रशियातून क्रूड तेलखरेदी थांबविल्याचे म्हटले आहे.

---

# निवडणूक आयोगाकडून मतांची चोरी!

## राहुल गांधी यांचा आरोप, 'अणुबॉम्ब'प्रमाणे पुरावे असल्याचा दावा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**निवडणूक आयोग भाजपसाठी मतांची चोरी करीत असल्याचा गंभीर आरोप लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी केला. तसेच पुरावे असल्याचा दावा करीत त्यांनी पुराव्यांची तुलना 'अणुबॉम्ब'शी केली.**



ज्या वेळी याचा स्फोट होईल त्या वेळी निवडणूक आयोगाला देशात लपण्यासाठीही जागा राहणार नाही, असेही ते म्हणाले. दरम्यान, यामध्ये सहभागी असलेल्या सर्वांनी देशद्रोह केला असून त्यांना सोडणार नसल्याचा इशारा देखील राहुल गांधी संसद भवन परिसरात माध्यमांशी संवाद साधताना दिला. निवडणूक आयोगाने शुक्रवारी बिहारसाठी प्रारूप मतदार यादी प्रकाशित केल्यानंतर राहुल गांधी यांनी ही टिप्पणी केली. बिहारमध्ये मतदारांना मतदानापासून वंचित ठेवण्याचा निवडणूक आयोगाचा हेतू असल्याचा आरोप करून, विरोधी पक्ष संसदेच्या दोन्ही सभागृहांत विशेष सखोल फेरनिरीक्षणच्या (एसआयआर) मुद्द्यावर चर्चेची मागणी करीत आहे.काँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांनी केलेले 'मतचोरी'चे आरोप निराधार असून


### गांधी यांची भाषाच अशोभनीय

तो अणुबॉम्ब आहे. स्फोट होईल तेव्हा निवडणूक आयोगाला देशात लपण्यासाठीही जागा मिळणार नाही. पाण्यासारखे वाहा, बॉम्बसारखे फुटू नका. त्यांनी जर बॉम्ब फोडला तर तर आम्ही संविधान वाचवू. त्यांचे काम स्फोट करणे आहे. त्यांना दुसरे काही करायचे नाही. विरोधी पक्ष लोकशाहीवर विश्वास नसल्यामुळे असे बोलतात. राहुल गांधी यांची भाषाच अशोभनीय आहे.

अशा 'बेजबाबदार' टिप्पण्यांकडे दुर्लक्ष केले पाहिजे, असे निवडणूक आयोगाने शुक्रवारी म्हटले. तसेच दररोज मिळणाऱ्या धमक्यांना न जुमानता निवडणूक अधिकाऱ्यांनी निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने काम करावे, असेही आयोगाने म्हटले आहे.काँग्रेसला २०२३ च्या मध्य प्रदेशातील निवडणुकीत त्यानंतर गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत अनियमिततेचा संशय होता. त्यानंतर झालेल्या निवडणुकीत मतदार जोडण्यात आले. आम्हाला वाटते की, राज्य पातळीवर (महाराष्ट्रात) मतांची चोरी झाली आहे. आम्ही चौकशी सुरू केली. त्यास सहा महिने लागले. आम्हाला जे आढळले.

# 'राष्ट्रीय पुरस्कार' जिंकल्यावर शाहरुख खानची प्रतिक्रिया

बॉलीवूडचा 'किंग' शाहरुख खानने १९९२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'दीवाना' सिनेमातून मनोरंजन विश्वात पदार्पण केलं होतं. सिनेमाचं स्वप्न उराशी बाळगून आणि गौरीच्या प्रेमापोटी शाहरुख दिल्ली सोडून मुंबईत आला आणि हळूहळू बॉलीवूडचा बादशहा झाला. मात्र, गेल्या ३३ वर्षांच्या कारकिर्दीत किंग खानला एकही राष्ट्रीय पुरस्कार मिळाला नव्हता. मात्र, आता ३३ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर शाहरुखची ही इच्छा पूर्ण होणार आहे. अभिनेत्याला ७१ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांमध्ये 'जवान' सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार जाहीर झाला आहे. शाहरुखचा हा पहिलाच राष्ट्रीय पुरस्कार आहे. विजेत्यांची घोषणा झाल्यावर शाहरुखने सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. हा पुरस्कार किंग खानने त्याच्या तमाम चाहत्यांना समर्पित केला आहे.शाहरुख म्हणतो, "नमस्कार, तुम्हा सर्वांना कळवण्यास आनंद होतोय की, मला यंदाचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा क्षण आयुष्यभरासाठी माझ्या आठवणीत राहणार आहे. केंद्र सरकार व संपूर्ण ज्युरी मेंबर्सचे मी मनापासून आभार मानतो. ज्या लोकांनी मला या पुरस्कारयोग्य



समजलं त्या सगळ्यांचे खूप मनापासून आभार. २०२३ मध्ये माझे जे सिनेमा प्रदर्शित झाले, त्या सगळ्या दिग्दर्शकांचे, लेखकांचे खूप खूप आभार...थँक्यू राजू सर, थँक्यू SID तसेच ॲटली सर आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष आभार. त्यांनीच मला 'जवान'मध्ये काम करण्याची संधी दिली. ॲटली सर हा पुरस्कार तुमच्यासाठी...तुम्ही म्हणता ना अगदी तसंचकिंग खान पुढे सांगतो, "मी माझ्या टीमचे सुद्धा मनापासून आभार मानतो. टीममधले सगळेजण कायमच माझी खूप काळजी घेतात, नेहमी माझ्यावर लक्ष ठेवून असतात. याशिवाय मी पडद्यावर अजून चांगला कसा दिसेन याचीही काळजी घेतात. तुमच्या प्रेमाशिवाय हा पुरस्कार जिंकणं केवळ अशक्य होतं...थँक्यू!"माझी पत्नी आणि माझ्या तिन्ही मुलांनी गेल्या काही वर्षांत मला कायम पाठिंबा दिला. त्यांनी मला इतकं प्रेम दिलंय की, आता माझ्या घरात सगळ्यात लहान मूल जर कोणी असेल तर ते मी आहे. माझ्या कुटुंबीयांना माझं सिनेमावर असलेलं प्रेम माहितीये...ते नेहमी मला पाठिंबा देतात आणि माझ्या प्रत्येक प्रोजेक्टसाठी मला वेळ देतात. राष्ट्रीय पुरस्कार मिळणं हा माझ्यासाठी खूप मोठा सन्मान आहे... मी जे काम करतोय, ते प्रेक्षक पाहत आहेत याची जाणीव यामुळे होते. आपण यापुढेही असंच काम केलं पाहिजे अशी प्रेरणा मिळते. अभिनय करणं हे माझं काम नसून ती माझी जबाबदारी आहे...

## सलमानच्या बहुचर्चित 'सिकंदर'चा टीझर

अभिनेता सलमान खानच्या आगामी 'सिकंदर' या सिनेमाची त्याच्या चाहत्यांमध्ये खूप उत्सुकता आहे. चाहत्यांच्या लाडक्या भाईजानचा २०२४ मध्ये एकही सिनेमा प्रदर्शित झाला नाही. यामुळे सलमानचे चाहते या सिनेमाची आतुरतेने वाट पाहत आहेत. या सिनेमाचा टीझर सलमानच्या वाढदिवशी म्हणजेच २७ डिसेंबर २०२४ ला प्रदर्शित होणार होता. पण माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे याचे प्रदर्शन पुढे गेले होते. आता सलमानचा 'सिकंदर' सिनेमाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'सिकंदर'च्या टीझरच्या सुरुवातीला सलमान पाठमोरा दाखवला आहे. यात सलमान एका गूढ ठिकाणावरुन चालत चालत पुढे जाताना दाखवला आहे.

## पाळीतील त्रास ही समस्या

अभिनेता गोविंदा आणि सुनीता आहुजा यांची मुलगी टीना आहुजाने मासिक पाळीबद्दल वक्तव्य केलं आहे. तिच्या या वक्तव्याची सध्या खूप चर्चा होत आहे. टीनाने तिच्या आईबरोबर एक मुलाखत दिली. या मुलाखतीत तिने तिच्या आयुष्यातील विविध गोष्टींबाबत चर्चा केली. यावेळी तिने मासिक पाळीत होणाऱ्या त्रासाबद्दल तिचं मत मांडलं. मासिक पाळीच्या वेदना फक्त मुंबई आणि दिल्ली सारख्या शहरांमधील महिलांना होतात. लहान शहरांमध्ये महिलांना पाळी कधी येते, कधी जाते हेही माहीत नसतं. तसेच पिरियड क्रॅम्प्स हे मानसिक असतात असा दावाही तिने केला. टीना आहुजा म्हणाली, "मी चंदीगडमध्ये जास्त राहते आणि मी फक्त मुंबई आणि दिल्लीतील मुलींना पिरियड क्रॅम्प्सबद्दल बोलताना ऐकलं आहे. निम्म्या अडचणी तर या त्याबद्दल बोलतात, त्यातूनच उद्भवतात. कधीकधी ज्यांना पिरियड क्रॅम्प्स होत नाही, त्यांनाही ते मानसिकदृष्ट्या जाणवू लागतात. पंजाब आणि इतर लहान शहरांतील महिलांना मासिक पाळी कधी येते किंवा रजोनिवृत्ती कधी येते हेही माहीत नसतं. त्यांना पाळी आल्याचं जाणवत नाही."मासिक पाळीदरम्यान महिलांना जो त्रास होतो, त्याला महिलांच्या आहाराच्या सवयींना कारणीभूत असल्याचं मत टीनाने मांडलं. "मला मासिक पाळीत पाठदुखी होत नाही. मला क्रॅम्प्सही येत नाहीत. पण, मी बऱ्याचदा मुलींना त्याबद्दल बोलताना ऐकते.



## मालिकेतील बहिणी ते खऱ्या आयुष्यातील मैत्रीणी

'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेतून अभिनेत्री वल्लरी विराज व आलापिनी या दोन अभिनेत्री घराघरांत पोहोचल्या. मालिकेदरम्यान त्यांच्यात चांगली मैत्री झाली. आता मालिका संपल्यानंतरही त्या अनेकदा एकत्र असल्याचे पाहायला मिळते. आता वल्लरी विराज आणि आलापिनीने नुकतीच 'मनोरंजन मराठी विश्व'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत त्यांनी मालिकेत एकत्र काम करण्याचा अनुभव, सेटवर घडलेले किस्से, त्यांची मैत्री कशी झाली, मालिका संपल्यानंतर त्यांनी त्यांची मैत्री कशी जपली, एकमेकींच्या आयुष्यात त्यांचे काय स्थान आहे, अशा अनेक बाबींवर गप्पा मारल्या.आलापिनीबरोबर झालेल्या मैत्रीबाबत वल्लरी विराज म्हणाली, "मालिकेच्या सेटवरच आम्ही भेटलो. व्यावसायिक पार्श्वभूमीमुळेच भेटलो. मालिकेत जेव्हा आपण प्रमुख भूमिकेत असतो तेव्हा बऱ्याच लोकांना वाटते की तुम्ही कोणाशी पटकन मैत्री करणार नाही. कोणी पटकन आपल्याशी मैत्री करायला येत नाही. कधीकधी गृहीतके असतात की, कोणाशी मैत्री करत नसेल, कारण ती प्रमुख भूमिकेत आहे. असं सगळं असताना कोणी माझ्याबद्दल काही बोललं असेल तरी आलापिनीने माझ्याकडे त्या पलीकडे पाहिले.लोकांना माझ्याबद्दल काय वाटतं, याचा तिने तिला माझ्याबद्दल काय वाटतं, यावर कधीही परिणाम करून घेतला नाही. तिने त्यापलीकडे जाऊन मी खरी कशी आहे यावर विश्वास ठेवला, म्हणूनच आम्ही इतक्या चांगल्या मैत्रिणी होऊ शकलो. खरंतर ती माझ्यापेक्षा लहान आहे. सेटवर कोणालातरी जास्त महत्त्व मिळत असेल किंवा आम्ही बाहेर कुठेतरी गेल्यावर क्वचित प्रसंगी असं घडलं की चाहत्यांनी मला ओळखलं आणि तिला ओळखलं नाही, तर ती स्वत: लोकांना म्हणते की मी फोटो काढून देते. अशा वेळी ईर्ष्या वाटणे हा माणसाचा स्वभाव गुण आहे. पण, ती अजिबात तशी नाही. हे करण्यासाठी खूप मोठं मन लागतं.मला वाटत नाही की वयाच्या २१ व्या वर्षी माझ्यामध्ये इतका समजुतदारपणा होता, ती अशी आहे म्हणून सेटवर काम करणं मला खूप सोपं गेलं. कामामुळे किंवा इतरही गोष्टींमुळे माझी चिडचिड झाली तर ते ऐकून घेण्यासाठी कायम ती होती.



## कामातून ब्रेक घेत छाया कदम यांनी गाठलं थेट कोकण

रोजच्या धकाधकीच्या आयुष्यातून ब्रेक घेत अनेक कलाकार मंडळी ही विविध ठिकाणी फिरायला जात असतात. अनेक कलाकार हे सहसा परदेशात त्यांच्या सुट्ट्या एन्जॉय करायला जात असतात. मात्र काही कलाकार मंडळींना त्यांच्या गावी सुट्ट्यांच्या आनंद घेणं अधिक आवडतं. त्यामुळे वेळ मिळाला की, ही कलाकार मंडळी थेट आपलं गाव गाठतात. अशीच दोन दिवसाची सुट्टी एन्जॉय करण्यासाठी मराठी अभिनेत्री गावी पोहोचली आहे. मराठीसह हिंदी सिनेविश्वात आपल्या अभिनयाने प्रेक्षकांचं मनोरंजन करणाऱ्या छाया कदम यांनी कामाच्या व्यग्रतेतून वेळ काढत आपलं गाव गाठलं. कोकणातील धामापुर हे छाया कदम यांचं मुळ गाव असून अनेकदा त्या आपल्या गावी भेटी देत असतात आणि सोशल मीडियाद्वारे या भेटीचे काही खास क्षण ते चाहत्यांबरोबर शेअर करत असतात. अशातच त्यांनी नुकतंच गावच्या भेटीचे काही व्हिडीओ शेअर केले आहेत.छाया कदम या सोशल मीडियावर कायमच सक्रीय असतात. सोशल मीडियावर त्या त्यांच्या विविध लूक्समधील फोटो शेअर करत असतात. तसंच कामानिमित्तची माहितीसुद्धा ते शेअर करत असतात. अशातच त्यांनी व्यग्र वेळापत्रकातून वेळ काढला आणि कोकणातील गावाला भेट दिली. याचे काही व्हिडीओ त्यांनी सोशल मीडियावर शेअर केले आहेत. या व्हिडीओमधील त्यांचा साधेपणा अनेकांचं लक्ष वेधून घेत आहे. छाया कदम यांनी त्यांच्या इन्स्टाग्रामवर काही व्हिडीओ शेअर केले आहेत. यातील पहिल्या व्हिडीओमध्ये त्या घराच्या उंबरठ्यावर बसून बाहेरच्या निसर्गाचा आनंद घेत आहेत.

अनोखा विक्रम | १२९ वर्षांत अशी कामगिरी करणारा जगातील पहिला गोलंदाज

# इंग्लंडच्या गस एटकिन्सनचा दुर्मिळ विक्रम!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यातील ओव्हल कसोटी सामन्यात इंग्लंडच्या गोलंदाजाने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. ओव्हल कसोटीत गस एटकिन्सनने दुखापतीनंतर पुनरागमन केलं. पुनरागमनाच्या कसोटी सामन्यातच एटकिन्सनने भारताविरूद्ध पहिल्याच डावात ५ विकेट्स घेतले. यासह त्याने एक दुर्मिळ विक्रम आपल्या नावे केला आहे. गेल्या १२९ वर्षांमध्ये अशी कामगिरी करणारा तो पहिलाच खेळाडू ठरला आहे.**

## एटकिन्सनने ३३ धावा देत बळी घेतले




दुखापतीमुळे पहिल्या चार कसोटी सामन्यांना मुकल्यानंतर ओव्हलमध्ये केलेल्या अविश्वसनीय कामगिरीसह, एटकिन्सनने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील स्वप्नवत कामगिरी सुरू ठेवली आहे. उजव्या हाताच्या या वेगवान गोलंदाजाने आता फक्त १३ सामन्यांमध्ये (२४ डावांमध्ये) ६० बळी घेतले आहेत, ज्यामध्ये २१ च्या सरासरीने आणि ३४.९ च्या स्ट्राईक-रेटने चार वेळा पाच बळी घेतले आहेत.इंग्लंडच्या जॉर्ज लोहमन यांच्यानंतर एटकिन्सन हा क्रिकेट इतिहासातील दुसरा गोलंदाज आहे, ज्याने कसोटी क्रिकेटमध्ये ३५ पेक्षा कमी स्ट्राईक रेटने ६० पेक्षा जास्त विकेट्स घेतल्या आहेत. लोहमन यांनी १२९ वर्षांपूर्वी १८९६ मध्ये झालेल्या त्यांच्या कसोटी कारकिर्दीत ११२ विकेट्स घेतल्या होत्या. आता १२९ वर्षांनंतर अशी कामगिरी करणारा एटकिन्सन पहिलाच गोलंदाज ठरला आहे.कमीत कमी ५० विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांमध्ये, फक्त शमार जोसेफचा स्ट्राईक रेट चांगला आहे, ज्याने लोहमन यांच्या ३४.१ स्ट्राईक रेटची बरोबरी साधली आहे आणि एटकिन्सनपेक्षाही चांगला आहे. गेल्या वर्षी कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यानंतर जोसेफने गेल्या महिन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध हा टप्पा गाठला. वेस्ट इंडिजच्या या स्टार गोलंदाजाने ११ सामन्यांमध्ये ५० विकेट्स घेतले आहेत आणि चार वेळा पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे.दुखापतीमुळे पहिल्या चार कसोटी सामन्यांना मुकल्यानंतर ओव्हलमध्ये केलेल्या अविश्वसनीय कामगिरीसह, एटकिन्सनने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील स्वप्नवत कामगिरी सुरू ठेवली आहे. उजव्या हाताच्या या वेगवान गोलंदाजाने आता फक्त १३ सामन्यांमध्ये (२४ डावांमध्ये) ६० बळी घेतले आहेत, ज्यामध्ये २१ च्या सरासरीने आणि ३४.९ च्या स्ट्राईक-रेटने चार वेळा पाच बळी घेतले आहेत.इंग्लंडच्या जॉर्ज लोहमन यांच्यानंतर एटकिन्सन हा क्रिकेट इतिहासातील दुसरा गोलंदाज आहे, ज्याने कसोटी क्रिकेटमध्ये ३५ पेक्षा कमी स्ट्राईक रेटने ६० पेक्षा जास्त विकेट्स घेतल्या आहेत. लोहमन यांनी १२९ वर्षांपूर्वी १८९६ मध्ये झालेल्या त्यांच्या कसोटी कारकिर्दीत ११२ विकेट्स घेतल्या होत्या. आता १२९ वर्षांनंतर अशी कामगिरी करणारा एटकिन्सन पहिलाच गोलंदाज ठरला आहे.कमीत कमी ५० विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांमध्ये, फक्त शमार जोसेफचा स्ट्राईक रेट चांगला आहे, ज्याने लोहमन यांच्या ३४.१ स्ट्राईक रेटची बरोबरी साधली आहे आणि एटकिन्सनपेक्षाही चांगला आहे. गेल्या वर्षी कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यानंतर जोसेफने गेल्या महिन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्ध हा टप्पा गाठला. वेस्ट इंडिजच्या या स्टार गोलंदाजाने ११ सामन्यांमध्ये ५० विकेट्स घेतले आहेत आणि चार वेळा पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे.भारत आणि इंग्लंड यांच्यातील ओव्हल कसोटी सामन्यात इंग्लंडच्या गोलंदाजाने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. ओव्हल कसोटीत गस एटकिन्सनने दुखापतीनंतर पुनरागमन केलं. पुनरागमनाच्या कसोटी सामन्यातच एटकिन्सनने भारताविरूद्ध पहिल्याच डावात ५ विकेट्स घेतले. यासह त्याने एक दुर्मिळ विक्रम आपल्या नावे केला आहे. गेल्या १२९ वर्षांमध्ये अशी कामगिरी करणारा तो पहिलाच खेळाडू ठरला आहे. दुखापतीमुळे पहिल्या चार कसोटी सामन्यांना मुकल्यानंतर ओव्हलमध्ये केलेल्या अविश्वसनीय कामगिरीसह, एटकिन्सनने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील स्वप्नवत कामगिरी सुरू ठेवली आहे.

### ६० पेक्षा जास्त विकेट्स

उजव्या हाताच्या या वेगवान गोलंदाजाने आता फक्त १३ सामन्यांमध्ये (२४ डावांमध्ये) ६० बळी घेतले आहेत, ज्यामध्ये २१ च्या सरासरीने आणि ३४.९ च्या स्ट्राईक-रेटने चार वेळा पाच बळी घेतले आहेत.इंग्लंडच्या जॉर्ज लोहमन यांच्यानंतर एटकिन्सन हा क्रिकेट इतिहासातील दुसरा गोलंदाज आहे, ज्याने कसोटी क्रिकेटमध्ये ३५ पेक्षा कमी स्ट्राईक रेटने ६० पेक्षा जास्त विकेट्स घेतल्या आहेत.

# जो रूटने तेंडुलकरला टाकलं मागे

## भारताविरूद्ध अशी कामगिरी करणारा पहिला इंग्लिश फलंदाज

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंग्लंडचा सर्वात अनुभवी कसोटी फलंदाज जो रूट एकामागून एक मोठे विक्रमी आपल्या नावे करत आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यातील ओव्हल कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी रूटने सचिन तेंडुलकरला एका खास यादीत मागे टाकण्यात यश मिळवले. कसोटी क्रिकेटमध्ये घरच्या मैदानावर सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत रूट आता दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. याशिवाय त्याने अजून एक विक्रम आपल्या नावे केला आहे.**






जो रूट मोहम्मद सिराजच्या वेगवान चेंडूवर पायचीत झाला. यासह रूट २९ धावा करत बाद झाला. रूटने चौथ्या कसोटीत १३ हजार धावांचा पल्ला गाठत कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला. या यादीत आता त्याच्या पुढे फक्त सचिन तेंडुलकर आहे. पाचव्या कसोटीत रूटने २९ धावांच्या खेळीत २ विक्रम केले आहेत.घरच्या मैदानावर कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज म्हणून सचिन तेंडुलकरला मागे टाकण्यासाठी रूटला २२ धावांची आवश्यकता होती. सिराजच्या ३३व्या षटकात चौकार लगावत हा विक्रम त्याने आपल्या नावे केली. जो रूट आता घरच्या मैदानावर सर्वाधिक धावा करण्याच्या बाबतीत सचिनला मागे टाकत दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. सचिन तेंडुलकरने त्याच्या कसोटी कारकिर्दीत घरच्या मैदानावर एकूण ७२१६ धावा केल्या होत्या, तर रूटने आता घरच्या मैदानावर एकूण ७२२९ कसोटी धावा केल्या आहेत. या यादीत ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉन्टिंग अव्वल स्थानावर आहे. ज्याने घरच्या मैदानावर कसोटी सामन्यांमध्ये एकूण ९२ सामन्यांमध्ये ७२५८ धावा केल्या आहेत.

### इतिहासात फक्त दोनच खेळाडू

आता रूटला पाचव्या कसोटीत पॉन्टिंगला मागे टाकण्याची संधी आहे.जो रूट हा इंग्लंडसाठी घरच्या मैदानावर भारताविरुद्ध २ हजार किंवा त्याहून अधिक कसोटी धावा पूर्ण करणारा पहिला खेळाडू ठरला आहे. भारताविरुद्ध अशी कामगिरी करणारा रूट हा जागतिक क्रिकेटमधील पहिला खेळाडू देखील आहे. आतापर्यंत, कसोटी क्रिकेटच्या इतिहासात फक्त दोनच खेळाडू असे आहेत .

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
। शनिवार ।
। दि. 2 ऑगस्ट 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती



## शिक्षण विश्व: आळंदीतील एमआयटी महाविद्यालयात

# "करियर लॉन्चपॅड" कार्यक्रम उत्साहात!

## विद्यार्थ्यांना मिळाली स्पर्धा परीक्षेची 'दिशा'!




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, आळंदी (देहू फाटा), पुणे येथील स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कक्षाच्या वतीने "करिअर लॉन्चपॅड" स्पर्धा परीक्षांवरील जागरूकता" या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाच्या तयारीची दिशा मिळाली.**

हा कार्यक्रम कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये साजरा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन संचालक डॉ. बी. बी. वाफारे , डीन डॉ. सुनील महाजन, डॉ. मानसी अतितकर, उपनिदेशक प्रो. अक्षदा कुलकर्णी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या सत्रामध्ये 'युनिक अकॅडमी'चे प्रा. केतनकुमार पाटील यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थितांना विविध स्पर्धा परीक्षांबाबत सखोल माहिती दिली. त्यांनी यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग, एसएससी यांसारखे स्पर्धा परीक्षा तसेच जीएटीइ, सेट, नेट, आयटी ऑफिसर अशा संगणकशास्त्राशी संबंधित परीक्षांचे स्वरूप, अभ्यासक्रम, तयारीचे तंत्र, वेळेचे व्यवस्थापन याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या सत्रात विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची आणि थेट संवाद साधण्याची संधी देण्यात आली. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कक्ष समन्वयक प्रा. दीक्षा कदम , प्रा. राजश्री एस. खडके व प्रा. ज्योती पी. सरवदे यांनी उत्तम प्रकारे संयोजन केले. तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कक्षाच्या सर्व सदस्यांचीही या कार्यक्रमात उपस्थिती लाभली.हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या संधी आणि योग्य दिशेने तयारी करण्याबाबत मार्गदर्शन करणारा ठरला.



# विद्यार्थ्यांनी घेतला किचन गार्डनिंगचा अनुभव!

## शिक्षण विश्व: मास्टरमाइंड ग्लोबल स्कूल व ज्युनियर कॉलेजमध्ये किचन गार्डन ड्राईव्हचे आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**मास्टरमाइंड ग्लोबल स्कूल आणि ज्युनियर कॉलेजमध्ये ग्रीन कलर डे निमित्त किचन गार्डन ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले. प्राचार्या डॉ. प्रदीपा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला.**

डॉ. प्रदीपा नायर यांनी विद्यार्थ्यांना किचन गार्डनिंगचे महत्त्व समजावून सांगितले आणि या उपक्रमात सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले. तसेच त्यांनी प्राथमिक व माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांना ग्रीन ग्रो बॅग्स वितरित करून त्यांच्यामध्ये शाश्वत उपक्रमांबद्दलची आवड निर्माण केली.शाळेतील विज्ञान विषयाच्या शिक्षिका अमृता जाधव व अक्षता शिवाजी डावखर तसेच विविध विभागांतील शिक्षकांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून हा उपक्रम अधिक समृद्ध आणि सहयोगात्मक बनवला. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना किचन गार्डन ड्राईव्हचे महत्त्वपूर्ण फायदे समजले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याचा आनंद घेतला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश पर्यावरणाची जाणीव निर्माण करणे हा होता. विद्यार्थ्यांना सुपीक व आरोग्यदायी आहाराची सवय लावणे. संघभावना व सहकार्याची जाणीव वाढवणे. ज ी व न कौशल्यांचा विकास, तणावमुक्ती व मानसिक स्वास्थ्य साधणे, सर्जनशीलता व जबाबदारीची भावना विकसित करणे. शैक्षणिक अभ्यासक्रमाशी जोडणी – विज्ञान, गणित आणि पर्यावरण अभ्यास या



विषयांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण झाली तसेच जीवन कौशल्यांचा विकास झाला, ज्यामुळे हा उपक्रम सर्वांसाठी अर्थपूर्ण आणि संस्मरणीय ठरला असे मुख्याध्यापिका नायर यांनी सांगितले.






Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13k+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org